# कार्यकारी सारांश

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (सीएजी) यांचा हा अहवाल महाराष्ट्र शासनाच्या वित्त व महसूल विभाग यांच्या अनुपालन लेखापरीक्षणात निदर्शनास आलेल्या बाबींशी संबंधित आहे. अनुपालन लेखापरीक्षण म्हणजे भारतीय संविधान, लागू कायदे, नियम व विनियम यामधील तरतुदींचे आणि प्राधिकाऱ्यांनी जारी केलेले विविध आदेश व सूचना यांचे अनुपालन केले जात आहे की नाही हे सुनिश्चित करण्यासाठी लेखापरीक्षित संस्थांच्या खर्चाची आणि महसुलाची तपासणी करणे होय.

लेखापरीक्षणाचे महत्त्वपूर्ण निष्कर्ष राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणणे हा या अहवालाचा प्राथमिक उद्देश आहे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारिणीला सुधारात्मक कृती करण्यास सक्षम करणे आणि धोरणे व निर्देश तयार करणे अपेक्षित आहे ज्यामुळे संस्थेच्या कार्यचालन कार्यक्षमतेत आणि वित्तीय व्यवस्थापनात सुधारणा होईल, अशा प्रकारे चांगल्या प्रशासनाला हातभार लागेल.

महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांचे कार्यालय महाराष्ट्र शासनाच्या 14 विभागांचे लेखापरीक्षण करते. महाराष्ट्र शासनाच्या वाणिज्यिक उपक्रमांशी संबंधित लेखापरीक्षण निरीक्षणे राज्य सार्वजनिक उपक्रम लेखापरीक्षण अहवालात नोंदवली जातात. खर्चाशी संबंधित लेखापरीक्षण निरीक्षणे अनुपालन लेखापरीक्षण अहवाल-व्यय यात नोंदवली जातात. या अहवालात महाराष्ट्र शासनाच्या मुद्रांक व नोंदणी, वित्त आणि गृह (उत्पादन शुल्क) विभागांच्या लेखापरीक्षणाचे महत्त्वपूर्ण परिणाम समाविष्ट आहेत.

या अहवालात लेखापरीक्षण निष्कर्ष तीन प्रकरणांमध्ये समाविष्ट आहेत. **प्रकरण I** मध्ये "प्रस्तावना, लेखापरीक्षीत घटकांची रूपरेखा, लेखापरीक्षणाचे नियोजन व आयोजन आणि लेखापरीक्षणाला शासनाचा प्रतिसाद" समाविष्ट आहे, **प्रकरण II** मध्ये अनुपालन लेखापरीक्षण परिच्छेदांशी संबंधित लेखापरीक्षण निरीक्षणे समाविष्ट आहेत आणि **प्रकरण III** मध्ये दोन विशिष्ट विषय आधारित अनुपालन लेखापरीक्षण समाविष्ट आहेत.

या अहवालाचा सारांश खाली सादर केला आहे:

**प्रकरण-I: प्रस्तावना**

यामध्ये अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासनाचे तीन विभाग जसे की मुद्रांक व नोंदणी, वित्त आणि गृह

(उत्पादन शुल्क) आहेत ज्यांचे लेखापरीक्षण महालेखाकार (लेखापरीक्षण-II), महाराष्ट्र, नागपूर द्वारा केल्या जाते.

लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट असलेल्या 21 परिच्छेदांवरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापन प्रलंबित होते. लोक लेखा समितीच्या 99 शिफारशींवरील कारवाई केलेल्या टिप्पण्या विभागाकडून प्रतीक्षेत होत्या.

**प्रकरण-II: अनुपालन लेखापरीक्षण परिच्छेद**

2022-23 या वर्षात महालेखाकार (लेखापरीक्षण-II), महाराष्ट्र, नागपूर यांनी मुद्रांक शुल्क आणि वस्तू व सेवा कर (जीएसटी)/राज्य उत्पादन शुल्क/मनोरंजन शुल्काच्या 217 युनिट्सच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली. लेखापरीक्षणाला खालील कमतरता निदर्शनास आल्या:

- दस्तऐवजाचे करारनामा म्हणून चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे विभागाने मुद्रांक शुल्काचा कमी दर लागू केला, ज्यामुळे ₹ 10.50 कोटींच्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

- मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई, यांनी एका मालमत्तेचे ₹ 62.28 कोटी मूल्यांकन केले आणि कलम 5 (g-a) अंतर्गत ₹ 3.11 कोटी मुद्रांक शुल्क आकारले. तथापि, लेखापरीक्षणाने ₹ 100.11 कोटी बाजार मूल्य मूल्यांकित केले, ज्यामुळे प्रदेय मुद्रांक शुल्काची ₹ 5.00 कोटी इतकी गणना झाली. यामुळे मालमत्तेचे कमी मूल्यांकन झाल्यामुळे, विभागाद्वारा ₹ 1.89 कोटींची कमी आकारणी करण्यात आली.

- नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी एक टक्का अनियमित सवलतीची परवानगी दिली, ज्यामुळे ₹ 1.50 कोटींच्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

- करारनाम्याने संपूर्ण जमिनीवरील सर्व हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध खरेदीदाराकडे हस्तांतरित केल्यामुळे मालमत्तेचे मूल्यांकन संपूर्ण जमिनीच्या क्षेत्रफळावर आधारित असायला हवे होते. तथापि, बाजारभाव निश्चित करताना विभागाने संपूर्ण भूखंड क्षेत्रफळ विचारात घेतले नाही ज्यामुळे ₹ 76.18 लाखांच्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

- विभागाने पाच वर्षांच्या भाडेपट्टा कराराच्या आधारे मुद्रांक शुल्काची गणना केली, आणखी पाच वर्षांसाठी नूतनीकरण करण्याची परवानगी देणाऱ्या कलमाकडे दुर्लक्ष केले, ज्यामुळे एकूण कालावधी 10 वर्षे झाला. यामुळे ₹ 29.71 लाखांच्या मुद्रांक शुल्काची व नोंदणी फीची कमी आकारणी झाली.

- एमवॅट नियमांच्या नियम 53(3)(a) अंतर्गत वजावटीच्या अतिरिक्त परवानगीमुळे ₹ 44.28 लाखांच्या व्याजासह ₹ 96.84 लाखांची कमी कर आकारणी झाली.

**प्रकरण -III: विशिष्ट विषय आधारित अनुपालन लेखापरीक्षण**

➢ **जीएसटी अंतर्गत ई-वे बिल प्रणाली**

ई-वे बिल (ईडब्ल्यूबी) प्रणालीचा उद्देश संपूर्ण प्रक्रियेचे स्वयंचलन आणि मानकीकरण करून कर चुकवेगिरीला आळा घालणे आणि जीएसटी संकलन वाढविणे यासाठी मदत करणे हा आहे. ई-वे बिल प्रणालीमध्ये विविध प्रक्रियांचा जसे की पोर्टलमध्ये आवश्यक व्यक्तींची नोंदणी करणे, ई-वे बिल तयार करणे, तयार केलेल्या ई-वे बिलांची मुदत वाढविणे, रद्द करणे आणि नाकारणे इत्यादींचा समावेश आहे. राज्य कर आयुक्त, महाराष्ट्र राज्य ई-वे बिल प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार आहेत. एसएससीएने शासनाच्या महसूल हिताचे रक्षण करण्यासाठी प्रणालीची परिणामकारकता आणि ई-वे बिल तरतुदी लागू करण्यासाठी विभागाच्या प्रतिबंधात्मक/अंमलबजावणी क्रियाकलापांची तपासणी केली.

2018-22 या वर्षासाठी 51 करदात्यांच्या अभिलेख्यांची सविस्तर तपासणी करून त्यांचे वस्तुनिष्ठ लेखापरीक्षण करण्यात आले. लेखापरीक्षणामध्ये ई-वे बिल प्रणालीच्या परिणामकारकतेतील कमतरता निदर्शनास आल्या आणि नोंदणी रद्द केल्यानंतर करदात्यांनी ई-वे बिल तयार केल्याची, करदात्यांनी ई-वे बिल तयार केले परंतु निरंक विवरण दाखल केल्याची, करदात्यांनी ई-वे बिल तयार केले परंतु विवरण दाखल न केल्याची, करदात्यांनी अनेक ई-वे बिल तयार करण्यासाठी एकच बीजक वापरल्याची, अवैध वाहनांचा वापर करून ई-वे बिल तयार केल्याची आणि करदात्यांनी असामान्य उच्च मूल्याचे ई-वे बिल तयार केल्याची उदाहरणे निदर्शनास आली. या संदर्भात महत्त्वाचे लेखापरीक्षण निष्कर्ष खाली सादर केले आहेत:

- 51 करदात्यांपैकी, विभागाने 10 विभागांमधील 43 करदात्यांची नोंदणी रद्द केली. यामध्ये 11 करदात्यांची नोंदणी अश्या कारणांमुळे जसे की सलग सहा महिने विवरण सादर करण्यात विफल होणे, व्यवसाय सुरू न करणे किंवा व्यवसायाच्या नोंदणीकृत ठिकाणाहून काम न करणे (एका प्रकरणात, करदात्याच्या विनंतीवरून रद्दीकरण करण्यात आले होते) यामुळे पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली होती. उर्वरित 32 करदात्यांना बोगस करदाते म्हणून वर्गीकृत करण्यात आले आणि त्यांची नोंदणी विविध कारणांमुळे सुरुवातीपासूनच रद्द करण्यात आली. लेखापरीक्षणात निदर्शनास आले की

समुचित अधिकाऱ्यांनी मध्यंतरीच्या काळात या करदात्यांनी केलेल्या पुरवठ्याची दखल घेतली नाही, तसेच नोंदणी रद्द करण्यापूर्वी त्यांनी प्रदेय कर निश्चित केला नाही तसेच तो वसूल केला नाही. यामुळे ₹ 96.85 कोटींच्या कराची व त्यावरील लागू व्याजाची वसुली झाली नाही.

- पाच करदात्यांनी ज्यांनी लेखापरीक्षण कालावधीत 'निरंक' विवरण दाखल केले होते त्यांच्या ई-वे बिलांच्या पुराव्यांवरून दिसून आले की त्यांनी करपात्र पुरवठा केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार, त्यांना ₹ 3.53 कोटींचे कर प्रदान करावयाचे दायित्व होते जे लागू व्याजासह वसूल करण्यायोग्य होते.
- लेखापरीक्षण कालावधीत नऊ करदात्यांनी अनेक महिने विवरण दाखल केले नाहीत, तरीही त्यांनी ई-वे बिल तयार केले. या करदात्यांनी ₹ 4.90 कोटी किंमतीच्या ₹ 0.72 कोटी कर परिणाम असलेल्या वस्तूंची वाहतूक केली.
- महाराष्ट्राबाहेरील 18 करदात्यांनी समान पॅन क्रमांक असलेल्या महाराष्ट्रातील मालप्राप्तकर्त्यांना पुरवठ्यासाठी तयार केलेल्या 18 ई-वे बिलांचा आढावा घेतला असता असे दिसून आले की सात प्रकरणांमध्ये, ₹ 10.59 कोटी किंमतीच्या वस्तू ₹ 1.56 कोटी किंमतीच्या कर परिणामासह महाराष्ट्रात प्राप्त झाल्या नाही. अशाप्रकारे, या सात ई-वे बिलांची सत्यता आणि ₹ 1.56 कोटी किंमतीच्या कर दायित्वाच्या विवरणांची पूर्तता पडताळता आली नाही.
- सहा सह आयुक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या 196 तपासणी प्रकरणांच्या नमुन्याच्या आधारे, लेखापरीक्षणामध्ये प्रतिबंधात्मक कार्यांच्या अंमलबजावणीमध्ये प्रशासकीय कमतरता जसे की ई-वे बिलांच्या पडताळणीसाठी समर्पित व्यवस्था नसणे, अपर्याप्त गस्ती वाहने आणि ई-वे बिलावर एनआयसीच्या विश्लेषणात्मक अहवालांचा अपुरा वापर या निदर्शनास आल्या. लेखापरीक्षणामध्ये विभागाकडून वाहनांच्या तपासणीमध्ये कमतरता निदर्शनास आल्या, ज्यामध्ये मागणी न करणे/कमी करणे आणि शासकीय खात्यात कर आणि दंड प्रदान करण्यास विलंब होणे यांचा समावेश होता.

**शिफारशी**

- शासनाने :

1. *पूर्वलक्षी प्रभावाने रद्दीकरण झाल्यास करदात्यांनी केलेल्या पुरवठ्याची खात्री करावी आणि त्यानुसार कर थकबाकी व व्याज निश्चित करावे आणि रद्दीकरण आदेशात त्याची मागणी करावी.*

*2. अंतिम प्राप्तकर्त्यांकडून आयटीसी वसूल करण्यासाठी योग्य कारवाई करावी. तसेच, बीओ पोर्टलवर एनजीटीपी डेटा उपलब्ध नसल्याच्या समस्येची तपासणी करावी आणि योग्य कारवाई करावी.*

*3. ई-वे बिल तयार करण्यासाठी अवैध वाहनांच्या वापराबद्दल कर अधिकाऱ्यांना संदेश/अहवाल प्रदर्शित करण्यासाठी कारवाई करावी.*

*4. तपासणी क्रियाकलापांसाठी समर्पित वाहने ठेवण्याचा विचार करावा.*

*5. ई-वे बिलावरील एनआयसीच्या विश्लेषणात्मक अहवालांच्या प्रभावी वापरासाठी विभागीय अधिकाऱ्यांना योग्य सूचना द्याव्या.*

*6. तपासणी दरम्यान कर व दंडाची मागणी करण्यासाठी आणि दायित्व व रोख खातेवहींचे समायोजन करून ते शासकीय खात्यात प्रदान करण्यासाठी विभागीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे आणि योग्य प्रक्रियेबद्दल सूचनांचा पुनरुच्चार करावा.*

- **2018-19 ते 2020-21 या वर्षासाठी जीएसटी प्रदान व विवरणे दाखल करण्यावर विभागाचे पर्यवेक्षण**

जीएसटी हा एक स्व-मूल्यांकन-आधारित कर आहे, ज्यामध्ये कर दायित्वाची गणना करण्याची, गणना केलेल्या कर दायित्वाचे निर्वहन करण्याची आणि विवरण दाखल करण्याची जबाबदारी करदात्यावर सोपवण्यात आली आहे. या एसएससीएचा उद्देश नियम व प्रक्रिया कर अनुपालनावर प्रभावी नियंत्रण करण्यासाठी संरचित केल्या आहेत की नाही आणि करदात्यांद्वारा त्यांचे योग्यरित्या पालन केले जात आहे की नाही; आणि समुचित अधिकाऱ्याच्या तपासणी प्रक्रिया, अंतर्गत लेखापरीक्षण आणि इतर अनुपालन कार्ये पुरेशी व प्रभावी आहेत की नाही याची खात्री प्राप्त करणे हा होता.

2018-19 ते 2020-21 या वर्षासाठी जीएसटी प्रदान व विवरणे दाखल करण्यावरील विभागाच्या पर्यवेक्षणाचे लेखापरीक्षण तीन वेगवेगळ्या भागांमध्ये करण्यात आले.

**प्रभार कार्यालयांचे लेखापरीक्षण:**

2020-21 या वर्षातील 10 प्रभार कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतल्यास असे दिसून आले की प्रभाऱ्यांच्या देखरेखीच्या कामांमध्ये कमतरता होत्या जसे की नऊ प्रभाऱ्यांमध्ये विवरणाची छाननी आणि लेखापरीक्षण न करणे; पाच प्रभाऱ्यांशी संबंधित 11 नोंदणी रद्द करण्यात नऊ ते 292 दिवसांचा विलंब होणे, 15 करदात्यांनी जीएसटीआर-10 दाखल न करणे आणि तीन करदात्यांनी विवरण

दाखल करण्यास विलंब (340 ते 813 दिवसांपर्यंत) होणे, परिणामी महसूल वसूल झाला नाही.

**केंद्रीकृत लेखापरीक्षणाचा परिणाम**

लेखापरीक्षणाने 362 करदात्यांच्या 718 उच्च मूल्याच्या डेटा विसंगतींचे नमुने निवडले. विभागाने 623 प्रकरणांना प्रतिसाद दिला. आयटीसी/कर प्रदानाशी संबंधित 145 आणि उलाढाल विसंगतीशी संबंधित 11 प्रकरणे अनुक्रमे ₹ 1055.43 कोटी आणि ₹ 2793.62 कोटी रक्कम विसंगतीसह अनुपालन कमतरतेची असल्याची निदर्शनास आले. व्याज अप्रदान/कमी प्रदान करणे, जीएसटीआर 2A आणि जीएसटीआर 3B मधील विसंगती, कालमर्यादा कालावधीनंतर दाखल केलेल्या जीएसटीआर 3B मध्ये घेतलेली आयटीसी, जीएसटीआर 3B/जीएसटीआर 9 मध्ये घेतलेल्या आयटीसीच्या तुलनेत आरसीएम अंतर्गत कराचे कमी प्रदान, जीएसटीआर 3B दाखल न करणे आणि टीडीएस विवरणाची तुलना करून करपात्र पुरवठ्याची कमी घोषणा यांमध्ये तुलनेने जास्त विचलन निदर्शनास आले.

**तपशीलवार लेखापरीक्षण**

जीएसटी विवरणांच्या तपशीलवार लेखापरीक्षणामध्ये लक्षणीय गैर-अनुपालन निदर्शनास आले. निवडलेल्या 100 प्रकरणांपैकी, 62 प्रकरणांमध्ये, सविस्तर अभिलेखे जसे वित्तीय विवरणपत्रे, पूरक वित्तीय खातेवही, बीजक, कराराच्या प्रती इत्यादी सादर केले गेले नाहीत, ज्यामुळे एक महत्त्वपूर्ण व्याप्ती मर्यादा निर्माण झाली. ही प्रकरणे आयटीसी उपलब्धता आणि कर प्रदानांमध्ये ओळखल्या गेलेल्या विसंगतींमुळे संभाव्य जोखीम दर्शवितात. ज्या करदात्यांचे अभिलेखे/विवरण तपासले गेले त्यांच्या बाबतीत 20 प्रकरणांमध्ये व्याज प्रदान न केल्यामुळे आणि पुरवठ्याचे चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे ₹ 154.64 कोटींच्या अनुपालन कमतरता लेखापरीक्षणाला निदर्शनास आल्या. याशिवाय, ₹ 6666.10 कोटींच्या विसंगती असलेल्या 119 प्रकरणांमध्ये आयटीसीचा वापर करणे, कर दायित्वाचे निर्वहन करणे आणि उलाढाल यांमध्ये विसंगत्या निदर्शनास आल्या.

त्यामुळे, लेखापरीक्षणाला कर अनुपालनाच्या प्रभावी तपासणीसाठी विभागाने स्वीकारलेल्या प्रणाली आणि कार्यपद्धतींत कमतरता निदर्शनास आल्या.

**शिफारश**

*लेखापरीक्षणात अधोरेखित केल्याप्रमाणे, जीएसटी प्रदान व विवरणे दाखल करण्यावरील विभागाच्या पर्यवेक्षणातील विचलनांना शासनाने त्वरीत दूर करावे आणि त्यांचे परिणाम लेखापरीक्षणाला कळवावे.*